I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S. (पोलीस ठाणे):** गोंदिया ग्रामीण **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0273 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/05/2026 05:25 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 11/05/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 11/05/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:08 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:55 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 12/05/2026 **Time (वेळ):** 04:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 12/05/2026 05:25 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 0.500 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मुख्य लेखा व वित्त विभाग,, जिल्हा परिषद गोंदिया,गोंदिया

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** उमाकांत गोवर्धन उगले

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1974

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदि, गोंदिया , राम नगर, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदि, गोंदिया , राम नगर, गोंदिया, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9664959090

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदेश चंद्रशेखर सांबरे | | | 1. गोविंदपुर रोड,Town/Village (शहर / गाव): पंचायत समिति कालोनी गोंदिया,Tehsil (तहसील): गोंदिया,Police Station (पोलीस ठाणे): गोंदिया शहर,District (जिल्हा): गोंदिया,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

तक्रार पोस्टेला देताच ताबडतोब

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | I PHONE 15 pro max कंपनीचा मोबाईल | 70,000.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्‍ यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | तक्रारदार यांचे पेफिक्सेशन संबंधीत कागदपत्र | .00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये किमतीचे 90भारतीय चलनी नोटा | 45,000.00 |
| 4 | इतर | संकीर्ण/विविध | 03 32GB क्षमतेचे सँनडिस्क कंपनीचे मेमरी कार्ड | .00 |
| 5 | इतर | संकीर्ण/विविध | 01नग बँग | .00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 1,15,000.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|
| | |

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद

दिनांकः- 12.05.2026

नांवः- उमाकांत गोवर्धन उगले, वय-52वर्ष पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया मो. क्र. 9664959090.

आम्ही आज दिनांक 11.05.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामे करीत असतांना वेळ 11.30 वा. एक इसम यांनी कार्यालयात येवुन लाच मागणी संबंधाने तक्रार द्यावयाची आहे असे सांगीतल्याने त्यांना त्यांचे नाव गाव तसेच तक्रारीसंबंधाने विचारणा केली त्यांनी त्यांचे नाव श्री. घनष्याम कोठुलाल बिसेन, सहायक शिक्षक जि.प. उच्च प्राथमिक शाळा कटंगी केंद्र कटंगी ता.जि. गोंदिया राहाणार- डोलारे ट्रेडर्सच्या पाठीमागे गोंदिया-तिरोडा रिंग रोड गोंदिया असे सांगुन त्यांचे सेवानिवृत्ती वेतनाचे उपदान व अंषराषीकरन बिल काढुन देण्याकरीता लेखा अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदिया येथील श्री सांबरे, कनिष्ठ लिपीक हे पन्नास हजार रुपयाची लाच मागणी करीत असल्याने त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्यास तक्रार देण्यास आलो आहे असे सांगीतले. त्यावरुन त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.

सदर तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी नापोषि. अषोक कापसे यांच्या हस्ते वर्ग-3 चे दोन कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करून देण्याबाबत मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र. 468/2026 दि. 11.05.2026 अन्वये दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.1988/2026 दि.11.05.2026 अन्वये श्री. राजु खेमचंद उके व श्री संदीप सुखराम दोनोडे यांना नापोषि.अषोक कापसे यांचेसह कार्यालयात पाठविले. नमुद कर्मचारी आज रोजी 13.30 वा. ला.प्र.वि. गोंदिया कार्यालयात हजर आले. नापोषि.अषोक कापसे यांनी पंचाची व आमची एकमेकांषी ओळख करून दिली.

आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमच्याकडे एका तक्रारदाराने एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधी तक्रार नोंदविलेली आहे. त्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची

मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे. या लाचेच्या सापळा कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन श्री. राजु खेमचंद उके यांना पंच क्र. 1 तर संदीप सुखराम दोनोडे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्याचे ठरविण्यात आले.

सापळा पार्टीतील सदस्य पोलीस निरीक्षक अरविंद राउत, स.फौ. चंद्रकात करपे, पो.हवा.संजयकुमार बोहरे, मंगेष काहालकर, नापोषि. संतोष शेंडे, संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने, अशोक कापसे, कैलास काटकर, मनापोषि संगीता पटले व चानापोषि.दिपक बाटबर्वे सर्व ला.प्र.वि. कार्यालय गोंदिया तसेच तक्रारदार यांचा नमुद दोन्ही पंचांना परिचय करून देवुन यांचीच एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीसंबंधी तक्रार असल्याचे पंचांना सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहुन दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली. ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केली. तक्रारदार यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबंधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी तक्रारीवर सह्या केल्या व त्यानंतर आम्ही त्या तक्रारीवर सही केली. तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.

तक्रार

ला.प्र.वि.गोंदिया

दि. 11.05.2025

प्रति,

मा. पोलीस उपअधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया.

विषयः- मला 50,000/- रुपयाची लाच मागणारे श्री संदेश सांबरे (लिपीक) लेखाधिकारी कार्यालय जि.प.गोंदिया यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत.

अर्जदारः- श्री. घनश्याम कोठुलाल बिसेन वय-58 वर्ष, पद- सहायक शिक्षक जि.प. उच्च प्राथमिक शाळा कटंगी केंद्र कटंगी ता.जि. गोंदिया राहणार- डोलारे ट्रेडर्सच्या पाठीमागे गोंदिया तिरोडा रिंग रोड गोंदिया मो.क्र. 9823542204

महोदय,

सेवेषी विनंती करतो की, सन 2000 वर्षी भंडारा जि.प. ता. तुमसर येथे मी शिक्षक म्हणुन लागलो आहे. सन 2020 वर्षी आंतरजिल्हा बदली करुण मी गोंदिया जि.प येथे आलो आहे. सध्या मी जि.प. उच्च प्राथमिक शाळा कटंगी येथे कार्यरत आहे दि. 31.05.2026 रोजी नियीमत वयोमानाप्रमाणे मी सेवानिवृत्त होत असल्याने दि. 06.04.2026 रोजी मा. गटशिक्षणाधीकारी प.स.गोंदिया यांनी माझी मुळ सेवापुस्तक जि.प. गोंदिया शिक्षण विभाग यांचेकडे पाठवुन मा. मुख्य लेखा व वित अधिकारी

जि.प. गोंदिया यांना सेवानिवृत्ती भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रकरण मंजुरीस्तव सादर केले आहे, तसेच शिक्षणाधिकारी (प्राथ) जि.प. गोंदिया यांनी दिनांक 25.04.2026 रोजी मा. मुख्यलेखा व वित अधिकारी जि.प. गोंदिया यांना सेवानिवृत्ती वेतन उपादान व अंषराषीकरण प्रकरण मंजुरीस्तव सादर केले आहे. त्या अनुषंगाने दि.07.05.2026 रोजी मी जी.प. षिक्षण विभाग इथुन सेवापुस्तक घेवुन मा. मुख्यलेखा व वित्त अधिकारी कार्यालय जि.प. गोंदिया येथे पेंषन केसचे काम करणारे लिपीक श्री संदेष सांबरे यांना भेटुन सेवापुस्तक दिली असता त्यांनी सेवा पुस्तक तपासुन पे फिक्सेसनमध्ये त्रुटी असुन तुमच्याकडे 1,92,000/- रुपये रिकव्हरी निघणार आहे असे सांगीतले पेंशनचे काम लवकर करायचे असेल व रिकव्हरी वाचवायची असेल तर 50,000/- रुपये दयावे लागतील असे ते म्हणाले, तेव्हा मी नाईलाजास्तव होकार देवुन निघुन गेलो.

श्री संदेष सांबरे मला मागत असलेले 50,000/- रुपये हि कायदेशिर फिस नसुन ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री पटली आहे व ती देण्याची माझी मुळीच इच्छा नाही तो माझ्या सेवानिवृत्तीचे कागदपत्र लवकर तयार करण्यासाठी व 1,92,000/- रुपयाची रिकव्हरी वाचविण्यासाठी 50,000/- रुपयाची लाच मागणारे श्री संदेष सांबरे यांच्यावर कायदेषिर कार्यवाही करण्याची विनंती आहे. श्री संदेष सांबरे यांच्याबरोबर माझे पुर्वीचे कुठलेही आर्थीक देवाणघेवान व भांडण तंटा नाही.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. श्री. सांबरे लिपिक, वित्त विभाग, जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया यांना लाचेमध्ये देण्याकरीता रू. 50,000/- हजर करण्यास सांगितले. त्यावरून त्यांनी स्वतःच्या बचतीतुन त्यांच्याकडे जमा असलेल्या रू. 500/- दराच्या 100 भारतीय चलनी नोटा असे एकुण रू. 50,000/- हजर केले. त्याबाबत वेगळी यादी तयार करण्यात आली आहे.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणा-या अँथ्राॅसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग व त्यांचे वैषिष्टे समजावून सांगुण अधिनस्त अंमलदार यांचे करवी प्रात्यक्षिक करुन दाखविला.

तक्रारदार यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गै.अ. सांबरे कनिष्ठ लिपिक, लेखा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद गोंदिया यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हाॅईस रेकार्डरद्वारे लाच मागणीची पडताळणी करुन लाच मागणीची योग्य पडताळणी झाल्यास पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

गैरअर्जदार यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र 1 यांना गैरअर्जदार यांचेकडे पाठवुन तक्रारदार व गैरअर्जदार यांच्यात होणारे संभाषण व्हाईस रेकाॅर्डरद्वारे मेमरी कार्ड मध्ये रेकाॅर्ड करणे असल्याने आमचे सुचनेवरुन नापशी.प्रषांत सोनवाने यांनी तक्रारदार तसेच दोन्ही पंचांना कार्यालयातील ”सोनी“ कंपनीचे ICD-PX470 डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर तसेच सॅनडिस्क कंपनीचे नविन मेमरी कार्ड काढुन दाखविले. व्हाईस रेकार्डर मध्ये नविन सेल टाकुन व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यात कोणत्याही प्रकारची व्हाईस रेकाॅर्ड फाईल नसल्याची पंचानी व आम्ही खात्री केली. त्यानंतर प्लाॅस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 3485DVFND1AQ असलेला एक नविन मेमरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर दोन्ही

पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत दोन्ही पंचानी व आम्ही खात्री केली. सदर डिजीटल व्हाईस रेकार्डर सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व गैरअर्जदार यांचे आवाज कषा पध्द्तीने रेकार्ड करण्यात येते, व्हाईस रेकार्डर कषा पध्दतीने बंद करण्यात येतो याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचाना समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकार्डरच्या सहाय्याने मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डर फार्मेट करुन पंचानी मेमरीकार्ड व व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरीकार्ड मध्ये कोणत्याही प्रकारची रेकार्ड फाईल नसल्याची खात्री केल्यानंतर सदर व्हाईस रेकार्डर बंद करुन सुस्थितीत करुन ट्रॅप सुटकेसमध्ये ठेवले.

त्यानंतर तक्रारदार यांना पंचासमक्ष गै.अ. हे कोठे मिळतील म्हणुन विचारणा केली असता गै.अ. हे त्यांचे कार्यालयात हजर मिळतील असे सांगीतले. गै.अ. यांचे कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदियाचे कार्यालयापासुन 3 किमी. अंतरावर असल्याने लाच मागणी पडताळणी कार्यवाही ला.प्र.वि.कार्यालयातुनच करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना लाच मागणी पडताळणी वेळी घेण्यात येणाÚया दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी ट्रॅप सुटेकसमधुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेले सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हाॅईस बाहेर काढले व वेळ 15.08 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हाॅईस रेकाॅर्डर कापडी पिशवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन दिले व त्यांना त्यांचे मोटारसायकल क्र.एम.एच.35/डब्लु-0826 ने पंच क्र. 1 यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथुन लेखा अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदिया येथे लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य ला.प्र.वि.कार्यालय गोंदिया येथेच थांबुन राहीलो.

तक्रारदार हे गै.अ.यांचेशी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे परत आले. आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार यांचे गळयात असलेले व्हाॅईस रेकाॅर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 16.20 वाजता बंद केले. व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमोरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260511_1508.mp3 रेकाॅर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घडलेली हकीकत कथन करण्यास सांगीतले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, ”मी, तक्रारदार यांचेसह गै.अ. यांचेशी लाच मागणी संबंधाने बोलणी करण्यास लेखा अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदिया येथे गेलो असता तेथे गै.अ. हे दिसुन न आल्याने तक्रारदार यांचेसह अर्धा तास वाट पाहुन कार्यालयाचे बाहेर आल्यावर व-हांडयातुन येत असलेल्या इसमाकडे तक्रारदार यांनी पाहुन त्यांना अर्धा तास वेट केलो असे म्हटल्यावर त्या इसमाने मी तिकडे

होतो असे म्हटले त्यावरुन तो इसम गै.अ. सांबरे लिपिक असल्याची माझी खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. यांना त्यांचे कामाचे काय झाले म्हणुन विचारले असता गै.अ. यांनी तुम्हाला सांगीतलो होतो असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी त्यांना थोडे जास्त होतात असे म्हटल्यावर गै.अ. यांनी बेसिक देला का असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी नाही असे म्हणुन त्यांना मग रिकव्हरी निघणार नाही का, एक ब्यानव्वं पुष्कळ होते असे म्हटल्यावर गै.अ. यांनी तक्रारदार यांना एक ब्यानव्वं भारी जाते का पन्नास भारी जाते असे विचारुन आता तुमची रिकव्हरी होईल नाही काही होईल आता येवढा त हक बनते, कारण मला समोर वाटप करूनच देना राहते, कारण पन्नास एकदम मले नाही भेटतील, मले त येथे दहाक भेटतात, खोटे नाही सांगत, कोण म्हणते, वीस वीस देला असे म्हटले त्यावर तक्रारदार यांनी माझ्यासाठी तर पन्नास जास्त झाले ना असे म्हटल्यावर गै.अ. यांनी पाचक हजार त्याच्यातुन कमी करून देतो, पण मी आता याच्यातुन करू शकत नाही, समोर फाईल वाढवायची आहे म्हणुन लटकली, नाही मी येथुन कमी करू शकतो, नाही त केसच संपुन जाता असे म्हटले तेव्हा तक्रारदार यांनी माझ्या याच्यातुन पाच हजार कमी करू म्हणजे पंचेचाळीस देवाच लागतील असे म्हणुन संध्याकाळ पर्यंत जमवुन देतो असे सांगुन तिथुन निघुन परत आलो असे पंच क्र. 1 यांनी सांगितलेल्या हकीकतीस तक्रारदार यांनीही दुजोरा दिला.

आम्ही लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरच्या मेमरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये 260511_1508.mp3 मध्ये तक्रारदार व गै.अ. यांच्यातील रेकाॅर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत व त्यास तक्रारदार यांनी दिलेल्या दुजो-यावरुन तसेच तक्रारदार व गै.अ यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांचे सेवानिवृत्ती वेतन उपदान व अंशराषीकरन चे बिल काढुन देण्याकरीता तसेच रिकव्हरी न करण्याकरीता रु.50,000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन तडजोडीअंती रु.45000/- लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षवल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली. त्यावरुन गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही आजच त्यांचे कार्यालयात जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्याना सापळा कारवाईच्या वेळी घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन पंच क्र. 1 यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली.
त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्याचप्रमाणे नापोशि प्रशांत सोनवाने यांना दोन्ही पंच व तक्रारदार यांचे समक्ष सुचना दिल्या की गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार हे गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईषारा करतील त्यावेळेस तसेच आरोपी कडुन जप्त करण्यात येणा-या कार्यवाहीवेळी आपण कार्यालयीन मोबाईलमध्ये सदरचे चित्रीकरण करावे अषा सुचना देवुन त्यांचे मोबाईलमध्ये 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 52010NAZN13Q असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन कार्यालयीन रियल मी कंपनीचे मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लाॅट मध्ये Insert केले. त्यानतर मोबाईल सेटींग मध्ये जावुन सदरचे मेमरीकार्ड मध्ये

पुर्वीचा कोणताही डेटा जतन नसल्याची आम्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर मोबाईल मधील सेटींगमध्ये जावुन फोटो व व्हिडीओ चित्रीकरण हे डायरेक्ट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जतन होणार असल्याचे सुनिष्चित करण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी सोनी कंपनीचे ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधिल मेमोरी कार्डमध्ये लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेली संभाषण फाईल संगणकाचे सहाय्याने सॅनडीस्क कंपनीचे दुसरे मेमोरी कार्ड क्र. 52010NAZN13Q मध्ये कॉपी केले व त्यानंतर दोन्ही मेमोरी कार्ड त्यांचे मुळ आवरणामध्ये ठेवुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षीत ठेवुन दिले.

त्यानंतर प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5172XV30140Q असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डीग फाईल नसल्याबाबत खात्री केली.

त्यानंतर आमचे सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी वेळ 17.18 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथुन त्यांचे खाजगी मोटारसायकलने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता लेखा अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदिया येथे रवाना केले. त्यानंतर आम्ही व पंच क्र. 2 शासकीय मोटारसायकल क्र.एम.एच.12/एक्स.एल.-7896, नापोशि संतोष बोपचे व प्रशांत सोनवाने हे शासकीय मोटारसायकल क्र.एम.एच.12/एक्स.एल.-7897, तर पोनि अरविंद राऊत, स.फौ.चंद्रकांत करपे, पो.हवा.संजयकुमार बोहरे, मंगेष काहालकर, नापोशि .संतोष शेंडे, अशोक कापसे हे शासकिय चारचाकी वाहनाने जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया येथे जाण्यास रवाना झालो. आम्ही सर्व जिल्हा परिषद गोंदियाचे आवारात पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संशय येणार नाही अशा स्थितीत उभे करुन व तिथेच थांबुन तक्रारदार यांचे नियोजीत ईशा-याची वाट पाहत बसलो. थोडया वेळाने तक्रारदार हे पंच क्र.1 सह जिल्हा परिषद गोंदिया येथील तळमजल्यावर असलेले लेखा अधिकारी कार्यालयाचे बाहेर व-हांडयात येवुन तक्रारदार यांनी आपल्या गळयातील दुपट्टा काढुन हातात ठेवुन गै.अ. यांनी त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्वीकारल्याचा नियोजित ईशारा केला. तक्रारदाराने केलेला नियोजित ईशारा पाहुन आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य पंच क्र. 2 यांचेसह तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे जवळ पोहचल्यावर तक्रारदार यांनी गै.अ.याचेकडे बोट दाखवुन तोच गै.अ.असल्याचा आम्हास ईशा-याने सांगीतल्यावर तक्रारदार यांना त्या ठिकाणाहुन थोडया अंतरावर जावुन थांबण्यास ईशा-याने सांगितले.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम कोणी स्विकारली व ती त्यांनी

कोठे ठेवली आहे? असे विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, तक्रारदार यांनी त्यांचे फुलपँटचे उजवे खिशात ठेवुन असलेली लाच रक्कम रु. 45000/- उजव्या हाताने काढुन गै.अ. सांबरे लिपिक यांचेकडे दिल्यावर त्यांनी ती लाच रक्कम आपले उजवे हाताने स्विकारुन त्यांचे जवळील बॅगमध्ये ठेवले आहे असे सांगीतल्याने त्याचे बॅगची तपासणी केली असता बॅगचे खालच्या बाजुला असलेल्या चोर खिशामध्ये लाच रक्कमेचा बंडल असल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना जवळ बोलावुन आमच्या सुचनेवरुन नापोशि प्रशांत सोनवाने यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात सापळा कार्यवाही पुर्ण झाल्याबाबत वक्तव्य ध्वनीमुद्रीत करुन व्हाईस रेकॉर्डर 17.55 वाजता बंद केले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260511_1718.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले.

त्यानंतर आम्ही लाच रक्कम स्विकारणा-या इसमास त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी आपले नाव श्री संदेश चंद्रशेखर सांबरे वय 35 वर्ष, पद- कनिष्ठ सहायक(लेखा) मुख्य लेखा व वित्त विभाग, वर्ग-3, जिल्हा परिषद गोंदिया, मुळ पत्ता- पंचायत समिती कॉलोनी, गोविंदपुर रोड गोंदिया ता.जि.गोंदिया असे सांगीतले.

त्यानंतर आमचे सुचनेवरून पोहवा मंगेष काहालकर यांनी शासकीय वाहनात ठेवलेली ट्रॅप सुटकेस व साहीत्य आणले. आम्ही पोहवा मंगेष काहालकर यांना आम्हा सर्वांचे हात अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात तपासण्यास सांगितले. त्यांनी काळया कापडाच्या सहाय्याने प्रकाशाची तीव्रता कमी केली. त्यानंतर अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात सर्वप्रथम आम्ही, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांचे हात तपासले असता कोणाचेही हातास कोणत्याच प्रकारची चकाकी दिसून येत नसल्याची गै.अ.यांना खात्री करुन दिली. त्यानंतर काळा कापड हटवुन प्रकाष पुर्ववत करण्यात आला.
त्यानंतर काळया कापडाच्या सहाय्याने प्रकाशाची तिव्रता कमी करुन गै.अ. संदेश सांबरे यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे बोटांवर, अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आली त्यानंतर काळा कपडा हटवुन प्रकाश पुर्ववत करण्यात आला.

त्यानंतर गै.अ.संदेश सांबरे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन त्यांचे जवळील बॅगमध्ये ठेवली असल्याने आरोपी यांनी सदर लाच रक्कम रु.500 दराचे 90 चलनी नोटा असे एकुण रू. 45000/- बॅगमधुन बाहेर काढुन आपल्या हातात ठेवल्या. आम्ही त्यांना गै.अ. हे बसुन असलेल्या खुर्चीवर एक कोरा कागद आंथरून त्यावर त्या नोटा ठेवण्यास सांगितले. त्यानुसार पंच क्र. 1 यांनी त्यावर त्या नोटा ठेवल्या. त्यानंतर आमचे सुचने वरुन पोहवा मंगेश काहालकर यांनी कक्षातील विद्युत दिवे बंद करुन लाच रकमेच्या नोटांना अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे प्रकाशात तपासले असता सदर नोटांना दोन्ही बाजुने अँथ्रॉसीन पावडरची निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने सदर रक्कम ही लाचेची रक्कम असल्याची आमची व पंचाची खात्री झाली. त्यानंतर प्रकाष पुर्ववत करुन लाचेच्या नोटांचे क्रमांक पंच क्रमांक 2 यांना वाचण्यास सांगितले असता त्यांनी वाचून दाखविलेले नोटांचे क्रमांक खालील प्रमाणे आहेत. आमचे सुचनेवरुन याबाबत नापोषि प्रशांत

सोनवाने यांनी कार्यालयीन मोबाईलमध्ये चित्रीकरण केले.

सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यांनी वाचुन दाखविले व पंच क्र. 1 यांनी ते तक्रारदार यांनी लाच रक्कम जमा करतेवेळी तयार केलेल्या लाच रकमेच्या नोंटांच्या यादीतील क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता सापळा कार्यवाही करीता जातांना रु.500/- दराचे 90 चलनी नोटांचे क्रमांक व गै.अ. यांनी स्विकारलेल्या नोटांचे क्रमांकाशी तंतोतंत जुळुन आले. त्या नोटा एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते गै.अ. श्री संदेष चंद्रशेखर सांबरे यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद केला. तसेच गै.अ. यांचेकडे असलेला I PHONE 15 pro max कंपनीचा मोबाईल एका हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्यावर जप्त मुद्येमालाचे वर्णनाचे टंकलिखीत केलेला कागद चिटकवुन सदर लिफाफ्यावर आमचे, दोन्ही पंचांचे व ज्याचे पासुन जप्त केले ते गै.अ.संदेश चंद्रशेखर सांबरे यांची सही घेवुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिलबंद करुन तपासकामी जप्तीपत्रक क्र. 1 अन्वये जप्त करण्यात आला.

त्यानंतर गै.अ. यांना तक्रारदार यांचे कामासंबंधीचे कागदपत्रबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे कपाटातुन काढुन दिल्याने कागदपत्राची पाहणी करुन कागदपत्रांचे छायांकीत प्रती जप्तीपत्रक क्र.2 अन्वये जप्त करण्यात आले.

त्यानंतर आमचे सुचनेवरून पंच क्र 1 यांनी गै.अ.संदेश चंद्रशेखर सांबरे यांची अंगझडती घेतली.

गै.अ. यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारुन त्यांचेजवळील बॅगचे खिशात ठेवली असल्याने लाच रकमेस लावुन असलेली अँथ्रॅसीन पावडर बॅगचे खिशाच्या संपर्कात आल्याने ती बॅग गुन्हयात पुराव्या कामी जप्तीपत्रक क्र. 3 अन्वये जप्त करण्यात आली.

त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना ते तक्रारदारासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया ते जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया येथे पोहचुन नियोजित इशारा करेपर्यत घडलेल्या घटना व झालेले संभाषण याबाबत सविस्तर माहिती सर्वासमक्ष पंच क्र. 2 यांना सांगण्याबाबत निर्देष दिले. त्यावरून पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत पुढील प्रमाणे आहे.

"मी तक्रारदार यांचेसोबत त्यांचे मोटारसायकलने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथुन जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया येथील लेखा अधिकारी कार्यालयात गेलो असता गै. अ. सांबरे हे त्यांचे कक्षात न दिसल्याने तेथील शेजारी महिला कर्मचारी यांना तक्रारदार यांनी कुठे गेले भाऊ असे विचारले असता ते आले नसल्याचे त्यांनी सांगीतले. तेव्हा तक्रारदार यांनी गै.अ. यांचे मोबाईल नंबर मांगीतला असता त्या महीला कर्मचा-याने गै.अ. यांचा मोबाईल नंबर दिला. त्यावरुन तक्रारदार यांनी गै.अ. सांबरे यांना फोन लावुन गै.अ. यांचे कक्षाचे बाहेर आलो तेव्हा व-हांडयातच गै.अ. दिसल्याने तक्रारदार यांनी त्यांना इकडे आहा का असे म्हणुन लवकर करा, रिकव्हरी एकही नाही पाहीजे असे म्हटले. त्यावर गै.अ. यांनी तो माझा काम आहे, तुम्हाला एक जरी रिकव्हरी निघाली तर पुरे पैसे नगदी वापस करुन टाकीन असे म्हटले, तेव्हा तक्रारदार यांनी ठिक आहे असे म्हणुन आपले फुलपॅटच्या खिशातुन लाच रक्कम काढुन गै.अ. यांना देवुन मोजुन घ्यान असे म्हटले तेव्हा त्यांनी

लाच रक्कम स्विकारुन त्यांचे जवळील बॅगमध्ये ठेवुन तुम्ही विश्वास ठेवा दोन दिवसात, जास्तीत जास्त तिसरा दिवस लागु शकते ठिक आहे असे म्हटल्याने आम्ही बाहेर आलो. त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास गै.अ. यांनी लाच रक्कम स्वीकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यानंतर आपण पंच क्र. 2 तसेच सापळा पार्टीतील सर्व सदस्यासह येऊन पुढील कार्यवाही केली.“ असी घटनेची हकीकत पंच क्र. 1 यांनी पंच क्र. 2 यांना सर्वासमक्ष सांगितली. यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामामध्ये घेण्यात आले आहेत.

तरी दिनांक 11.05.2026 रोजी तक्रारदार श्री. घनश्याम कोठुलाल बिसेन, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 11.05.2026 चे 15.08 वा ते 17.55 वा, मुख्य लेखा व वित्त विभाग जिल्हा परिषद कार्यालय गोंदिया जि. गोंदिया येथे पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही व सापळा कारवाई दरम्यान श्री संदेश चंद्रशेखर सांबरे वय 35 वर्ष, पद- कनिष्ठ सहायक (लेखा) मुख्य लेखा व वित्त विभाग, वर्ग-3, जिल्हा परिषद गोंदिया, मुळ पत्ता- पंचायत समिती का‍ॅलोनी, गोविंदपुर रोड गोंदिया ता.जि.गोंदिया यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन तक्रारदार यांचे सेवानिवृत्ती वेतनाचे उपदान व अंशराषीकरन बिल काढुन देण्याकरीता तसेच तक्रारदार यांचे पेफिक्सेशनमध्ये त्रृटी असुन तक्रारदाराकडे रु. 1,92,000/- ची रिकव्हरी निघत आहे हि रिकव्हरी वाचवण्यासाठी रु. 50,000/- लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु.45000/- लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारुन गैरफायदा घेतला आहे. म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री संदेश चंद्रशेखर सांबरे वय 35 वर्ष, पद- कनिष्ठ सहायक (लेखा) मुख्य लेखा व वित्त विभाग, वर्ग-3, जिल्हा परिषद गोंदिया, मुळ पत्ता- पंचायत समिती का‍ॅलोनी, गोविंदपुर रोड गोंदिया ता.जि.गोंदिया यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम 1988 (सुधारीत अधिनीयम 2018 ) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद होणे करीता कायदेशिर फिर्याद देत आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Revchand Khushal Singanjude (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Revchand Khushal Singanjude

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** 15101000402RKSM8101S

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** |
| 1 | पुरुष | 1991 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग / वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| **8** | **9** | **10** | **11** | **12** | **13** |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| **14** | **15** | **16** | **17** | **18** | **19** | **20** |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**